

**पुणे :** मॉडर्न हायस्कूलमध्ये इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना पोलिसांनी मार्गदर्शन केले.

# पोलिसांनी विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

**पुणे, दि. २१ -** पंख संस्था व क्किकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जीवनमूल्य शिक्षण प्रकल्पांतर्गत शिवाजीनगर येथील मॉडर्न हायस्कूल मधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी पोलिसांशी संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे बापू शिंदे, दीपक जाधव उपस्थित होते. पंख संस्थेच्या अध्यक्ष स्मिता आपटे, ट्रस्टी कल्याणी भाबड, मॉडर्न हायस्कूलच्या मुख्याध्यापिका संगीता लकारे, उपमुख्याध्यापिका रोहिणी काळे, पर्यवेक्षिका सीमा कुळधारण आदी उपस्थित होते. पोलीस अधिकाऱ्यांनी मुलांशी उत्तम संवाद साधला. मुलांनी पोलिसांना असंख्य वेगवेगळे प्रश्न विचारले. पोलिसांमार्फत या प्रश्नांना योग्य पद्धतीने उत्तरे देऊन मुलांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. छेडछाड, सायबर गुन्हे या विषयांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी स्वओळख, ताणतणाव नियोजन, एच.आय.व्ही. एड्स, व्यसनाधिनता, लैंगिकता शिक्षण अशाप्रकारची वेगवेगळ्या विषयांवरची सत्रे शाळांमध्ये घेण्यात येतात. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंखच्या सामाजिक कार्यकर्त्या क्षितिजा शिर्के यांनी केले. आभार मॉडर्न हायस्कूलचे शिक्षक निवृत्ती गोपाळे यांनी मानले.